# मराठी दलित रंगभूमी आणि स्त्री नाट्यलेखिका

**डॉ. रमेश तुकोजीराव देशमुख**
मराठी विभाग प्रमुख,
सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जाफ्राबाद जि. जालना

प्रस्तावना :

दलित रंगभूमी ही मराठी रंगभूमीचा उज्वल असा स्वतंत्र विभाग आहे. तिचे रुपसौंदर्य आगळेवेगळे आहे. तिच्या स्वरूपाची देखनेपनाची चिकित्सा आपल्याला थोडक्यात येथे करावयाची आहे. दलित रंगभूमीचा उदय 'जलसा' या कला प्रकरातून झालेला आहे. तमाशा, जलसे या प्रकाराला नवा रुपाशय देऊन दलित रंगभूमीचा उदय झाला आहे. खरे तर तमाशा रंगभूमी हीच मूल मराठी रंगभूमी आहे. या रंगभूमीची वाढ, तिचा विकास मांग, महार , कोल्हाटी यांनी केला. या जुन्या कलाप्रकारातून स्वतःचे मनोरंजन करण्याची एक रित शोधली. यातूनच पुढे दलित नाटक, दलित एकांकिका, दलित पथनाटके असा दलित नाटकांचा स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंतचा प्रवास झालेला आहे.

दलित नाटकांच्या प्रवाहात पहिले दलित नाटक म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाचे स्थान अढळ आहे. म्हणून महात्मा फुले दलित नाट्य चळवळीचे आद्य होत. त्यांनी पुरोहित शाहीवर घणाघाती हल्ला चढविला. एक गरीब शेतक-याच्या अडाणीपनाचा गैर फायदा घेऊन जोशीबुवा त्या गरीब शेतक-याची व त्याच्या पत्नीची फसवणूक करतात हे अत्यंत प्रभावीपणे 'तृतीय रत्न' या नाटकात दाखविले आहे. सामाजिक अधिष्ठान असलेले मराठी रंगभूमीवरचे व दलित परंपरा असलेले या दोन्ही दृष्टीने हे पहिले नाटक ठरते. या नाटकातून त्यांनी समाजाला विद्येचे महत्व पटवून देण्यासाठी हे नाटक लिहिले. या नाटकाची प्रेरणा घेऊन शाहीर किशन फागू बनसोडे हे पहिले शिल्पकार ठरतात.

इ.स. 1920 मध्ये मोरेश्वर तांबे यांनी 'महारची सून' हे नाटक लिहून प्रस्थापित नाटक मंडळींना फार मोठा धक्का दिला. तो काळ बालगंधर्वाच्या समांतर रंगभूमीचा होता. इ. स. 1940 ते 1945 च्या दरम्यान दीनबंधू शेगांवकरांनी 'राजा आक्रोश', प्रभाकर वराळे यांनी 'सिद्धार्थ गौतम' ही नाटके लिहिली. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा व विचारांचा प्रभाव दलितावर होऊन काव्यकथा, नाटकातून विद्रोहाचे सुर उमटू लागले.

1950 मध्ये प्रभाकर यांनी 'जगाच्या कल्याणा' याच काळात भि. शि. शिंदे यांनी 'चंद्रहार' ही नाटके लिहिली. या नंतर रंगभूमीचा दुवा साधणारे नाटक म. भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' रंगभूमीवर आले. पुढे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'माणुसकीचा बंड', 1958 साली मा. आ. करंडे गुरुजी यांनी 'नवी वाट', तर म. भि. चिटणीस यांनी पुन्हा जिवंत झाल्या सावल्या' हे नभोनाट्य लिहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे चित्र उभे केले.

अशा प्रकारे महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकपासून दलित नाटकांचा प्रवास गृहीत धरावा लागेल. स्वातंत्र्यानंतर ख-या अर्थाने दलित नाटक व दलित रंगभूमी या संकल्पना रूढ झाल्या. याच काळात दलित जाणिवा विकसित झाल्या. डॉ. आंबेडकरांचे विचार जनमानसात रुजू लागले. दलितांना आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली होती. लेखनी हाती आली होती. दलित साहित्याचा सूर्य उगवला होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात दलित साहित्याची संकल्पना स्पष्ट झाली होती. तमाशा, वगनाट्य, दलित शाहिरी इत्यादी लोककलांच्या माध्यमातून उगम पावलेली दलित रंगभूमी आज संपूर्ण महाराष्ट्रात स्वतेजाने उजळून निघत आहे. दलित स्त्रीनाट्यलेखिका बोटावर मोजण्याइतक्या असल्या तरी त्यांच्या नाट्यकृतींच्या माध्यमातून दलित नाट्यचळवळीविषयी जवळीक साधण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

***दलित नाट्यलेखिका :***

शिल्पा मुंब्रस्कर यांची झाडाझडती (1984) ही नाट्यकृती दलित स्त्रीच्या दुहेरी गुलामगिरीविरुद्ध प्रकर्षाने आवाज उठवून परिवर्तनाचा नवा विचार मांडते. अशा तऱ्हेने या नाटकातील दलित नाट्यविषयाचा तपशील हा केवळ अन्याय आणि आक्रोश यांचेच निदर्शक नसून तो सामाजिक समता, परिवर्तन आणि न्याय प्रस्थापनेसाठी चालना देणारा आहे.

नाटकात नाट्यलेखिकेने दलित स्त्रीच्या जीवनाशी निगडित असणाऱ्या समस्या व प्रश्न यांनाच अधिक प्राधान्य दिलेले दिसून येते. त्या दुष्टिकोणातून ही नाटक संघर्षप्रधान असण्यापेक्षा समस्याप्रधानच असलेले जाणवते. या नाटकातून दलितांच्या जीवनदर्शनाच्या अनुषंगाने प्रकट झालेला विद्रोह व नकार प्रामुख्याने दलित मुक्तीकडे झेपवणाऱा आहे.

प्रस्थापित समाज व संस्कृती यावर घणाघाती हल्ला चढविताना या नाटकातून विद्रोहाचा अंगारा ठसठशीतपणे प्रकट झाला आहे. दलीतांनी ज्या मूल्य संकल्पना स्वीकारल्या आहेत त्याच्यासाठी या नाटकातील संघर्ष निर्माण झाला, तो वास्तवपूर्ण पातळीवरचा असून त्या आधारे स्व त्वाचा शोध परंपरेला नकार, परंपरावादी दृष्टि, क्रांतिकारकत्व, जीवनात न्याय – स्वातंत्र्य – समता – बंधुता यांच्याशी बांधिलकी इ. लक्षणे प्रस्तुत दलित नाटकातून प्रकट होतात. या शिवाय प्रस्थापितांच्या विरोधी दलितांच्या मनात असलेली बेफाम चिड तिव्रतेने प्रकट होते. दलित स्त्रीचे जीवन, तिचे राहणीमान, तिचे दणकट, प्रखर, कठोर, तीव्र, उत्कट राग या बरोबरच दलित जाणिवेचे, स्त्री दुःखाचे, तिच्या वेदनांचे आणि व्यथांचे

ज्या दलित नाटकातून ती पुढे आली आहे त्या अनुभवाशी इमान राखून अधिकार वाणीने सत्य निरपेक्षतेने दलित स्त्रीची समस्या मांडण्यासाठी नाट्यलेखिकेची लेखनी वचनबद्ध झालेली दिसते.

निष्कर्ष:

दलित रंगभूमीने तळागळातल्या लोकांच्या आशा आणि आकांक्षा नाटका मध्ये मांडल्या आहेत. दलित रंगभूमीवरचे पहिले नाटक ‘तृतीय रत्न’ आहे. या नाटकपासून झालेली सुरुवात महत्वपूर्ण अशीच आहे. भारतीय समजव्यवस्थेतील अस्पृश्य, भटका, गुन्हेगार, अवहेलना, जुलूम, जबरदस्ती, अन्याय, अत्याचार असे अनेकानेक विषय घेवून दलित नाटककारांनी नाटके लिहिली आहेत. दलित नाटक हे मुळातच आंबेडकरी चळवळीतून निर्माण झाले आहे. त्यात समस्याप्रधान व दलितांचे वास्तव चित्रण पाहायला मिळते. समाज प्रबोधनाच्या तीव्र इच्छेमधूनच दलित रंगभूमी उदयाला आलेली आहे. दलित रंगभूमीच्या वाटचालीत लोकरंगभूमीवरील तमाशा – जलसा शहिरी या लोककलांनी मोलाचे योगदान दिले आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. डॉ. मधुकर मोकाशी – दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

2. संपा. भालचंद्र फडके – दलित रंगभूमी, सुरेश एजन्सी, पुणे